**बचत खाती/चालू खाती असलेल्या ग्राहकांची पासबुके अद्ययावत करणे**

युबीडी.सीओ.पीओटी.पीसीबी.सर्क्यु/०२/०९.११.००/२००२-०३

१८ जुलै २००२
२७ आषाढ १९२४ (शके)

सर्व प्राथमिक नागरी सहकारी बँकांचे
मुख्य कार्यकारी अधिकारी

माननीय महोदय/महोदया,

**बचत खाती/चालू खाती असलेल्या ग्राहकांची पासबुके अद्ययावत करणे**

रिझर्व बँकेच्या नजरेस असे आणून देण्यात आले आहे कि, काही बँकांमध्ये जेथे पासबुके अद्ययावत करताना संगणकाद्वारे नोंदी केल्या जातात, त्यात धनादेशाचा क्रमांक, रक्कम कोणाकडून मिळाली त्या पार्टीचे नाव इत्यादीच्या नोंदी नसतात. ″क्लियरींगद्वारे″ किंवा ″क्लियरिंगला″ या नोंदी फारच संदिग्ध आहेत, विशेषतः तेच आकडे वेगवेगळ्या तारखेला परत येतात तेव्हा.

खातेदारांच्या समस्या हलक्या करण्याच्या दृष्टीने, आणि अधिक चांगल्या ग्राहक सेवेचा एक भाग म्हणून सुध्दा, बँकानी, ग्राहकाने धनादेश देऊन आणि बँकर्स क्लियरिंग हाऊसद्वारे प्रस्तुत करून रक्कम काढ्ली आहे किंवा इलेक्ट्रॉनिक क्लियरिंग सेवेद्वारे नोंदी उद्भवल्या आहेत हे विचारात न घेता, प्रत्येक व्यवहाराचे संपूर्ण विवरण समाविष्ट करण्यासाठी पॅकेजेसची पुनर्रचना करून, संपूर्ण माहिती देण्याच्या दिशेने कष्ट घ्यावे.

**आपला विश्वासू,**
**(एस.व्ही. सराफ)**
**उप महाव्यवस्थापक**